

# कोणीतरी काहीतरी केले पाहिजे

♦ अजय चित्रे

मी एका वादग्रस्त विषयावरील माझी मते आपणासमोर मांडणार आहे. ती आपल्याला कितपत पटतील कुणास ठाऊक? पण अगदी खरं सांगायचं तर माझी मते फारशी कुणालाच पटत नाहीत हा धडा मी अगदी लहानपणीच शिकलो. तरीही नाउमेद न होता मते मांडायला मात्र मी कधीच कचरलो नाही. मला असं वाटतं की, मतं चुकीची असोत वा नसोत, ती जर का लोकांपुढे मांडली नाहीत तर त्यावर चर्चा होत नाही. जर चर्चा झाली नाही तर किती चुकीची आहेत हे लक्षात येत नाही. जर का लक्षात आले नाही तर आपली चुकीची मते ही बरोबरच आहेत असा आपला गैरसमज होण्याचा संभव असतो. त्यामुळे आपली मते सर्वांसमोर दिलखुलासपणे मांडलेलीच बरी, नाही का? फक्त विनंती एवढीच आहे की, जर माझी मते तुम्हाला पटली नाहीत तर त्याची कारण मला आपण शांत चित्ताने कळवा. मी देखील शांत चित्ताने ती ऐकून घेईन. भारतीय व अमेरिकन संस्कृतीतील एक महत्वाचा फरक म्हणजे, अमेरिकन लोक वादविवाद चाललेला असताना उगाचच डोक्यात राख घालून तावातावाने भांडत बसत नाही. पण भारतीयांच्या वादविवादाचे स्वरूप मात्र पटकन लोकसभेच्या अधिवेशनासारखे होऊन जाते. तसे होऊ नये, मतभेदांवर हसतखेळत चर्चा व्हावी, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि त्यातून ज्ञानप्रबोधन व्हावे एवढीच माफक इच्छा.

गेल्या वर्षी बृहनमहाराष्ट्र मंडळाच्या वृतांत्त बातमी वाचली की, महाराष्ट्रातील अल्पसंख्याकांनी महाराष्ट्र राज्याविरुद्ध खटला

कोणीतरी काहीतरी केले पाहिजे

भरला. कशासाठी, तर म्हणे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याकांवर मराठी शिकण्याची सक्ती करते. तसे करू नये म्हणून. ही बातमी ऐकताच मनाला मोठा धक्काच बसला. मंडळी, आपण सर्वजण अमेरिकेत अल्पसंख्याक आहोत, आणि एकंदरीत अमेरिकन सरकारची धोरणे लक्षात घेता, कोणीही कितीही प्रयत्न केले तरी आपण पिढ्यानपिढ्या अल्पसंख्यकच राहू. पण येथे असताना आपण इंग्रजी भाषा आपली मानतो. तिच्यावर प्रेम करतो. तिचा मनापासून अभ्यास करतो. आपल्या पुढच्या पिढीला शिकवतो. आपली एक खास मराठी शिकवण आहे की 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.' या म्हणीला अनुसरून आपण अमेरिकन समाजात वावरतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे, येथे टिकून राहण्यासाठी इंग्रजी भाषा शिकणे अत्यावश्यक आहे. अमेरिकन नागरिकत्व मिळवण्याकरता इंग्रजी भाषेची ओळख असणं आवश्यक आहे. एकंदरीत अमेरिकन सरकारने इंग्रजी भाषा शिकण्याची गरज निर्माण केलेली आहे. आपण मराठी माणसं

येथेच कमी पडतो का? याच आपण विचार करायला हवा. अल्पसंख्याकांना महाराष्ट्रात राहूनदेखील मराठी शिकण्याची गरज वाटत नाही. ती गरज निर्माण करायला हवी. मराठीचा ओ की ठो माहीत नसलेल्यांना मुंबईत सर्रास टॅक्सी, रिक्षा चालवण्याचे परमिट मिळते. त्यामुळे मराठी येत असलेला रिक्षावाला मिळणे आता कठीण झाले आहे. एकंदरीत मराठी शिकले नाही तरी कोणाचे काही अडत नाही. त्यामुळेच अल्पसंख्याकांना मराठी शिकण्याची गरज वाटत नाही.

आता प्रश्न असा पडतो की, मराठी भाषेचा एवढा अट्टाहास का? मराठी भाषा मृत होत चालली आहे अशी भीती मला वाटते आहे का? तर मुळीच नाही. जगभर पसरलेली मराठी मंडळी मराठी भाषा टिकवण्यासाठी जी धडपड करतात त्यावरून असे नक्कीच म्हणता येईल की मराठी भाषेला मरण नाही. मंडळी, प्रश्न मराठी भाषा मृत होण्याचा नाही. प्रश्न भाषा आणि त्या अनुषंगाने मराठी भाषिक मागे पडण्याचा आहे. प्रश्न महाराष्ट्र देश टिकवण्याचा आहे. एकदा भाषा मागे पडली की संस्कृती मागे पडते. संस्कृती मागे पडली की देश मागे पडतो आणि एकदा देश हातातून निसटला की त्याचे पुनर्वसन करणे हे फार कठीण काम होऊन जाते. आपण मराठी समाजाने ज्युविश लोकांचा इतिहास डोळ्यापुढे ठेवायला हवा. ज्युविश समाज हा मेहनती व विद्वान लोकांचा समाज आहे. जगाच्या पाठीवर जेथे ते गेले तेथे त्यांनी खूप यश व पैसे मिळवले. पण पैसे कमवता कमवता स्वत:चा देश टिकवून ठेवावा हा विचार मात्र त्यांनी कधी केला नाही. शेवटी जर्मनीत हिटलरने त्यांचे हाल करण्यास सुरुवात केल्यानंतर मात्र त्यांचे डोळे उघडले. त्यावेळी आपला एखादा देश असण्याचे महत्व त्यांना कळून चुकले. त्यानंतर अमेरिक, ब्रिटन व इतर पाश्चिमात्य देशांच्या साहाय्याने त्यांनी पॅलेस्टाइन या देशाचा एक भाग पटकावला. तेथे जगभर पसरलेल्या ज्युविश लोकांना पाठवले व स्वत:चा इस्त्राईल हा देश निर्माण केला. या घटनेला अनेक वर्षे होऊन गेली तरीदेखील आज इस्त्राईलमध्ये काय परिस्थिती आहे ते आपण जाणतोच.

एकंदरीत महाराष्ट्रातून येणाऱ्या बातम्या वाचल्या की, मराठी समाज मागे पडत चाललेला आहे असे उघड उघड दिसते. महाराष्ट्राची तुलना परवाच कुणीतरी बिहार राज्याबरोबर केलेली ऐकल्यावर तर मनावर फार मोठा आघात झाला. कर्नाटक, आंध्रप्रदेश ही राज्ये प्रगतिपथावर असताना आपल्या महाराष्ट्राचा बिहार कसा झाला? बिहारी लोकांची संख्या वाढल्याने की गुन्हेगारी वाढल्याने? की राजकीय नेत्यांचा गलथानपणा वाढल्याने? महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता असे लक्षात येते की, आपला देश अजूनही जातीपातींवर आधारलेल्या राजकारणात गुंतलेला आहे. ही जात जोपर्यंत मनातून जात नाही आणि मराठी समाजात जोपर्यंत एकजूट होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील मराठी समाजाची परिस्थिती सुधारणार नाही. अर्थात प्रत्येकाला आपल्या जातीचा अभिमान असण्यास काहीच हरकत नाही. मी स्वत: सीकेपी आहे हे अभिमानाने सर्वांना सांगतो. पण त्याहूनही जास्त अभिमान मला, माझी आत्ये-चुलत भावंडे ही दलित, ब्राह्मण, सारस्वत समाजातील आहेत हे सांगताना वाटतो. एकंदरीत माझा सीकेपीपणा हा केवळ माझ्या खाण्यापिण्याच्या आवडींपुरता मी मर्यादित ठेवलेला आहे. परंतु आजही सुशिक्षित मराठी माणसे लग्नासाठी जाहिरात देताना सीकेपी नवरा पाहिजे किंवा वधू ब्राह्मण समाजातील असावी, कुठल्याही पोटशाखेतील चालेल असा मजकूर उघड उघडपणे लिहितात याचे दु:ख वाटते. लग्नाच्या या अशा जाहिराती वाचल्यावर इतर जातींमधील लोकांच्या मनात चढाओढीची भावना निर्माण होत नसेल का? याचा विचार आपण करायला हवा.

अर्थात एकदा मराठी समाजात एकजूट झाली की सर्व प्रश्न सुटतील असेही नाही. त्यासाठी विचारपूर्वक मराठी संस्कृती टिकवण्याचे उपाय शोधण्याची गरज आहे. महाराष्ट्रातून निवडून येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मराठी बोलता यायलाच हवे, टॅक्सीवाले, रिक्षावाले यांना मराठी बोलता यायलाच हवे, बॉलीवूडमध्ये काम करणाऱ्या बहुतांशी कर्मचाऱ्यांस मराठी बोलता यायलाच हवे, कुठल्याही कंपनीत मग ती सरकारी असो वा खाजगी असो ठरावीक जागा या मराठी बोलता येणाऱ्या लोकांसाठी राखून ठेवाव्यात, अशा प्रकारचे कठोर नियम अंमलात आणण्याची गरज आहे.

आपल्या भावी पिढ्यांना हक्काने जगता यावे याकरता महाराष्ट्र देश टिकवून ठेवण्याची गरज आहे. मंडळी, आता जग छोटे झालेले आहे. पूर्वीच्या काळी अमेरिकेत बसून महाराष्ट्रात सुधारणा करण्याच्या गप्पा करणे म्हणजे उंटावर बसून शेळ्या हाकण्यासारखे वाटत असे. आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आपल्याला अमेरिकेत राहूनही बरेच काही करता येण्यासारखे आहे. पण कुठलाही महत्त्वाचा मुद्दा निघाला की, मराठी माणसं त्यावर नुसत्या गप्पा मारून, कोणीतरी काहीतरी केले पाहिजे असे म्हणून मोकळी होतात व शेवटी कुणीच काहीच करत नाही. मंडळी, हा मुद्दा मात्र फार गंभीर आहे. या मुद्द्याबाबत मात्र कुणीतरी काहीतरी केलेच पाहिजे. ♦

**अजय चित्रे**